नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ८६ | Issue - 86 | वार मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५३ | Blow- Tuesday Date 12 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडीचा मोर्चा

## मतचोरीचा आरोप हा निवडणूक आयोगाच्या कागदपत्रांच्या आधारे, त्यावर मी शपथपत्र का देऊ? राहुल गांधींची भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रामध्ये इंडिया आघाडीनं मोदी सरकारविरोधात एल्गार पुकारला. राहुल गांधींनी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारवर मतचोरीचा आरोप केल्यानंतर इंडिया आघाडी मैदानात उतरली. यावेळी पोलिसांनी मोर्चाला परवानगी न दिल्यानं आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार धुमश्चक्री पाहायला मिळाली. निवडणूक आयोगावर धडक देणाऱ्या मोर्चाला पोलिसांनी आडकाठी केली, पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना ताब्यात घेतलं आणि पुन्हा संसदेत सोडलं. देशातील प्रत्येक मतदार स्वच्छ आणि निष्पक्ष मतदार यादीची मागणी करत असल्याचं यावेळी राहुल गांधींनी म्हटलं.




मतचोरी संबंधी सादर केलेली सर्व माहिती ही निवडणूक आयोगाने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारेच करण्यात आली आहे, ती माहिती माझी नाही. त्यामुळे मी त्यावर शपथपत्र का देऊ? असा प्रश्न काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर थेट मतचोरीचे आरोप केले आहेत. त्यावर आयोगाने त्यांना स्वाक्षरी केलेले शपथपत्र सादर करण्याची सूचना दिली होती.

निवडणूक आयोगाच्या पवित्र्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, निवडणूक आयोगाने त्याच्याकडे असलेली सर्व माहिती त्यांच्या वेबसाइटवर टाकावी, सर्वांना कळेल. हा फक्त मुद्द्यांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. ही समस्या केवळ बंगळुरूमध्येच नाही, तर अनेक मतदारसंघांत झाली आहे.

विरोधी पक्षांचे ३०० खासदार निवडणूक आयोगाला एकच दस्तऐवज देण्यासाठी जाणार होते, पण त्यांना रोखण्यात आले. कारण निवडणूक आयोगाला भीती आहे की, एवढे खासदार तिथे गेले तर निवडणूक आयोगाची खोटी बाजू उघडी पडेल असा आरोप राहुल गांधींनी केला. राहुल गांधी पुढे म्हणाले की, ही लढाई आता केवळ राजकीय राहिलेली नाही, तर संविधान आणि 'एक मतदार - एक मत' या तत्त्वासाठीची लढाई आहे. कर्नाटकमध्ये आम्ही स्पष्ट दाखवून दिले की, तिथे 'मल्टीपल मॅन, मल्टीपल वोट' झाले. पूर्ण विरोधक या अन्यायाविरुद्ध एकत्र लढत आहेत. आता आयोगासाठी हे लपवणे कठीण जाईल. राहुल गांधींनी इंडिया आघाडीतील सर्व सहकारी खासदारांचे एकजुटीने मतचोरी विरोधातील लढ्यात सहभागी झाल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, ही केवळ राजकीय लढाई नाही, तर लोकशाही आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठीची लढाई आहे, आणि आपण सर्व मिळून ती जिंकू.

### डोंगर चढताना पिकअप रिव्हर्स आली, दरीत कोसळली

# आठ महिलांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : जिल्ह्यातील खेड तालुक्यात भाविकांवर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना घडली असून भीषण अपघातात ८ महिलांचा मृत्यू झाला आहे. पाईट येथील कुंडेश्वरचे डोंगर चढताना भाविक प्रवाशांनी भरलेली पिकअप रिव्हर्स आली अन् ५ ते ६ वेळा पलटी घेत दरीत कोसळली. या भीषण अपघातात ८ जणांचा दुर्दैवी अंत झाला असून २० ते २५ जण जखमी झाल्याची माहिती आहे. आज दुपारी सव्वा एक वाजताच्या सुमारास हा अपघात घडलाय. गावातील शेतकरी महिला श्रावण सोमवारनिमित्ताने देवदर्शनासाठी निघाल्या असता ही मन हेलावून टाकणारी घटना घडली.

खेड जवळील लगतच्या गावातील २५ ते ३० प्रवासी ज्यामध्ये महिला आणि लहानगी मुलेही होती, हे सर्वजण कुंडेश्वर मंदिरात दर्शनाला निघाले होते. तिसरा श्रावणी सोमवार असल्यानं इथं भाविकांची मोठी गर्दी होत असते. मात्र, देवदर्शनासाठी निघालेल्या या महिलांवर काळाने घाला घातला. मंदिराकडे जाणाऱ्या नागमोडी वळणाने वरती येत असताना, प्रवाशांनी भरलेली पिकअप अचानकपणे रिव्हर्स आली अन् ५ ते ६ वेळा पलटी घेत, दरीत कोसळली. या दुर्घटनेत २० महिला आणि लहान मुलं गंभीर जखमी झाल आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे आत्तापर्यंत ७ भाविकांचा मृत्यू झालाय. हा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जाती. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी जखमींवर उपचार सुरू असलेल्या एका रुग्णालयात धाव घेत घटनेची व परिस्थितीची माहिती घेतली. अपघाताच्या घटनेनंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केलं होतं. मात्र, प्रशासनाकडून लवकर रुग्णवाहिका व मदत न मिळाल्याने काही भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे.

दरम्यान, या घटनेनं खेड तालुक्यावर शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच तहसीलदार, पोलीस प्रशासन व स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली होती. जशा रुग्णवाहिका भेटल्या, खासगी वाहनं भेटली तशी जखमींना जवळील खासगी व सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती आमदार बाबाजी काळे यांनी केली. या दुर्घटनेत ८ ते ९ महिला दगावल्याची माहिती आहे, असे आमदार काळे यांनी सांगितले.

# खाजगी सावकारांच्या त्रासाला कंटाळून पंढरपुरातील व्यापाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी खाजगी सावकाराकडून घेतलेल्या पैशाची मुद्देबालापेक्षा व्याज अधिक देऊनही कर्ज फिटत नसल्याने कर्जबाजारीपणा, आर्थिक विवंचना आणि सावहारांच्या त्रासाला कंटाळून पंढरपुरातील व्यवसायिक आणि राहत्या घरी छताला लुंगीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे.

**सात जणांविरुद्ध खाजगी सावकारीसह ॲट्रॉसिटीचा गुन्हा**

पंढरपूर तालुका वाखरी येथे ही घटना घडली असून मताच्या खिशात सापडलेल्या चिठ्ठीच्या आधारे सात जणाविरुद्ध खाजगी सावकारी सह ट्रॉसिटी कायद्यान्वये ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सुरेश मारुती कांबळे (वय ६४,रा. वाखरी) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सुरेश कांबळे यांचे पंढरपुरात दिनेश फुटवेअर नावाची चप्पल विक्रीचे दुकान आहे. दोन मुले आणि मुलीचे लग्न झालेले ते बाहेरगावी असतात. घरी सुरेश व पत्नी शकुंतला कांबळे हे दोघेच राहतात. शकुंतला कांबळे यांचे गुडघ्याची शस्त्रक्रिया झाली आहे शुक्रवारी सायंकाळी ६.३० वाजता सुरेश कांबळे हे पत्नीला आंघोळीसाठी पाणी ठेवल्याचे सांगून बाहेर गेले,



त्यानंतर शकुंतला या अंघोळ, व स्वयंपाक करून हॉलमध्ये बराच वेळ बसल्या, मात्र पती येत नसल्याने, मोबाईल कॉल घेत त्यांनी मुलाशी संपर्क केला, व काही वेळाने मुलाचा एक मित्र घरी आला व त्यांनी वरच्या मजल्यावर जाऊन पाहिले असता सुरेश कांबळे यांनी लुंगीच्या साह्याने गळफास घेतल्याची दिसून आली.

या प्रकारानंतर पोलिसांना प्रचारण करण्यात आली त्यावेळी महेश सुरज कांबळे यांच्या खिशात शिट्टी सापडली. व त्यात व्यवसायाची परिस्थिती बिकट झालेली असून खाजगी सावकारांची सहा टक्के व्याजाने पैसे घेतले आहेत. हिरवा हिरवी करून नैराशी आली असून त्यातून टोकाचे पाऊल उचलण्याची नमूद आहे तसेच संबंधित खाजगी सावकारावर कारवाई करावी असेही लिहिले आहे.

चिठीतील मजकुरानुसार भारत हिलाल, विकी अभंगराव, शिवाजी गाजरे, बंडू भोसले, काशी ज्वेलर्स चे बापू गायकवाड, संजय व्यवहारे, व इरफान अशा सात जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे शकुंतला कांबळे यांनी फिर्याद दिली आहे संबंधित सावकार हे जातीवाचक शिवीगाळ करून धमक्या देत असेल त्रास देत होती असे त्यामध्ये नमूद केलेले आहे.

# युक्रेन-रशिया युद्ध थांबवण्यासाठी ट्रम्प-पुतीन भेटणार; दुसरीकडे मोदींचीही तयारी, थेट झेलेन्सींशी फोनवर चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एकीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमीर पुतिन १५ ऑगस्ट रोजी अलास्कामध्ये एक महत्त्वाच्या शिखर परिषदेसाठी भेटणार आहेत. त्याचवेळी दुसरीकडे युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी फोनवरुन चर्चा केली. यावेळी मोदींनी भारताची भूमिका स्पष्ट केली. भारत शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्यासाठी तयार आहे. युक्रेनसोबतचे संबंध अधिक मजबूत करु असं आश्वासन नरेंद्र मोदींनी झेलेन्स्की यांना दिले.



अलास्का शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवर महत्त्वपूर्ण चर्चा केली आहे. मोदींनी युक्रेनप्रती असणारा भारताचा पाठिंबा आणि शांतीप्रक्रियेत सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली. दोघांनी संयुक्त राष्ट्र महासभेदरम्यान (णछत्रऋ) सप्टेंबरमध्ये प्रत्यक्ष भेट होण्याचा निर्धारही केला आहे.

रशिया-युक्रेन युद्ध, द्विपक्षीय सहकार्य आणि जागतिक कूटनीतीवर या दोन नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. या चर्चेत युद्ध संपविण्याच्या शक्यतांवरही मोठ्या प्रमाणावर विचारविनिमय झाला. झेलेन्स्की यांनी मोदींना रशियाच्या हल्ल्यांची भयावह माहिती दिली. जापोरिझ्झियामधील बस स्थानकावर झालेला ताजा हल्ला हा सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करण्यासाठीच केला गेला, असे ते म्हणाले. या हल्ल्यात डझनभर लोक जखमी झाले. झेलेन्स्की यांच्यासोबत झालेल्या चर्चेची माहिती नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर दिली. राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्याशी बोलून मला आनंद झाला. भारत शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी कटिबद्ध आहे आणि युक्रेनसोबतचे संबंध अधिक मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहे असं ते म्हणाले. एकीकडे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील देशांवर मोठा टॅरिफ बॉम्ब टाकला आहे. तर दुसरीकडे ते अलास्कामध्ये रशियाचे अध्यक्ष पुतीन यांची भेट घेणार आहेत. रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प हे प्रयत्न करणार असल्याची माहिती आहे. झेलेन्स्की यांनी रशियावर लादलेल्या निर्बंधांचा आणि रशियन तेल-ऊर्जा निर्यातीवर मर्यादा आणण्याचा मुद्दा उचलला. रशियाचा आर्थिक पुरवठा रोखल्याशिवाय युद्ध थांबणार नाही असा दावा त्यांनी केला आहे. तसेच जागतिक नेत्यांनी रशियावर दबाव टाकण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन त्यांनी केले. जगाची नजर सध्या रशिया-युक्रेन संघर्षावर आहे. भारताचा शांततेसाठीचा संदेश जागतिक पातळीवरील तणाव कमी करण्याच्या प्रयत्नांशी जुळणारा आहे. पण या चर्चेतून युद्धविरामाचा मार्ग निघेल का, की संघर्ष आणखी चिघळणार? हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### महाराष्ट्र ठरले देशातील पहिले राज्य

### अत्याधुनिक सुरक्षा सुविधांची सक्ती

# विद्यार्थी स्कुल व्हॅनला राज्य शासनाची मंजुरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शालेय (स्कूल) बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. याबाबतची अधिसूचना जारी होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त असलेली अधिकृत स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४ ) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने इड-तख या श्रेणीतील असणारं आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली. राज्य सरकारकडून परिवहन विभागामार्फत सन २०१८ पर्यंत स्कूल व्हॅनसाठी परवाने देण्यात येत होते. मात्र, स्कूल व्हॅन विद्यार्थी वाहतूकीसाठी असुरक्षित असल्याचे सांगत काहींनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. केंद्राच्या मानकानुसार राज्य शासनाने नियमावली तयार करून व्हॅन सुरू करण्याबाबतची सूचनावली प्रसिद्ध केली आहे. त्याआधारे राज्य सरकारने हे धोरणात्मक पाऊल टाकले असून या संदर्भात अधिसूचना जारी होईल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले. स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थी वाहतूकीसाठी अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. चार चाके असल्याने वाहन उलटण्याची शक्यता नगण्य असते. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीला प्रथम प्राधान्य आहे. सुरक्षित वाहतूकीसह बेरोजगारांना रोजगाराची संधी देण्यासाठी स्कूल व्हॅनला मंजुरी देण्यात येत आहे. नव्या स्कूल व्हॅनमधून विद्यार्थी वाहतूकीचा व्यवसाय सुरू करणाऱ्यांना राज्य सरकारकडून परवाने देण्यात येतील. राज्यात अत्याधुनिक सुरक्षा सुविधांनी युक्त स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

**स्कूल व्हॅनमधील वैशिष्ट्ये**

- जीपीएस
- सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन
- अग्निशमन अलार्म प्रणाली
- दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा
- ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर
- पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे
- स्कूल व्हॅनमध्ये लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी
- गाडीच्या छतावर शाळेचे नाव

## संपादकीय....

### धुमश्चक्री

राहुल गांधींनी निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारवर मतचोरीचा आरोप केल्यानंतर इंडिया आघाडी मैदानात उतरली. यावेळी पोलिसांनी मोर्चाला परवानगी न दिल्यानं आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार धुमश्चक्री पाहायला मिळाली. निवडणूक आयोगावर धडक देणाऱ्या मोर्चाला पोलिसांनी आडकाठी केली, पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना ताब्यात घेतलं आणि पुन्हा संसदेत सोडलं. देशातील प्रत्येक मतदार स्वच्छ आणि निष्पक्ष मतदार यादीची मागणी करत असल्याचं यावेळी राहुल गांधींनी म्हटलं.केंद्रामध्ये इंडिया आघाडीनं मोदी सरकारविरोधात एल्गार पुकारला. मतचोरी संबंधी सादर केलेली सर्व माहिती ही निवडणूक आयोगाने दिलेल्या कागदपत्रांच्या आधारेच करण्यात आली आहे, ती माहिती माझी नाही. त्यामुळे मी त्यावर शपथपत्र का देऊ? असा प्रश्न काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर थेट मतचोरीचे आरोप केले आहेत. त्यावर आयोगाने त्यांना स्वाक्षरी केलेले शपथपत्र सादर करण्याची सूचना दिली होती. निवडणूक आयोगाच्या पवित्र्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, निवडणूक आयोगाने त्याच्याकडे असलेली सर्व माहिती त्यांच्या वेबसाइटवर टाकावी, सर्वांना कळेल. हा फक्त मुद्द्यांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न आहे. ही समस्या केवळ बंगळुरूमध्येच नाही, तर अनेक मतदारसंघांत झाली आहे. विरोधी पक्षांचे ३०० खासदार निवडणूक आयोगाला एकच दस्तऐवज देण्यासाठी जाणार होते, पण त्यांना रोखण्यात आले. कारण निवडणूक आयोगाला भीती आहे की, एवढे खासदार तिथे गेले तर निवडणूक आयोगाची खोटी बाजू उघडी पडेल असा आरोप राहुल गांधींनी केला. राहुल गांधी पुढे म्हणाले की, ही लढाई आता केवळ राजकीय राहिलेली नाही, तर संविधान आणि 'एक मतदार - एक मत' या तत्त्वासाठीची लढाई आहे. कर्नाटकमध्ये आम्ही स्पष्ट दाखवून दिले की, तिथे 'मल्टीपल मॅन, मल्टीपल वोट' झाले. पूर्ण विरोधक या अन्यायाविरुद्ध एकत्र लढत आहेत. आता आयोगासाठी हे लपवणे कठीण जाईल. राहुल गांधींनी इंडिया आघाडीतील सर्व सहकारी खासदारांचे एकजुटीने मतचोरी विरोधातील लढ्यात सहभागी झाल्याबद्दल आभार मानले.

# काजीकणबस येथे आढळले पांढरी मातीच्या ढिगाऱ्याखाली शिवमंदिर

## मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी निधीची आवश्यकता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : अक्कलकोट पासून अवघ्या २२ किलोमीटर अंतरावर असलेल्या काजीकणबस गावात मध्यवर्ती ठिकाणी पांढऱ्या मातीच्या ढिगाऱ्याखाली यादव काळातील शिवमंदिर आढळून आल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे त्यातून श्रावण महिना असल्यामुळे महादेवाने दर्शन दिले या भावनेतून मंदिर पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

ही वार्ता समाजसेवक मल्लीनाथ कल्याणशेट्टी यांना ग्रामस्थांनी कळविली. त्यांनी तातडीने सोलापूर येथील इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांना मंदिर परिसराचे संशोधन करण्यासाठी बोलावून घेतले त्यांनी काजीकणबस येथे जाऊन मंदिराची पाहणी केली त्यानंतर ग्राम सभा घेतली. यावेळी सरपंच अनुसया बंदीछोडे, उपसरपंच दत्तात्रय मुनाळे, पोलीस पाटील दीपक मंठाळे, सुरेश मटगे विश्वनाथ गयाळे,नारायण बंदीछोडे, राजशेखर मंठाळे. स्वामीनाथ मुनाळे विजयकुमार मजगे, मनोज सोळसे,दिनेश



मंठाळे सर, काशिनाथ खुबा शांतप्पा सोळशे, राजशेखर मुनाळे, नितीन मुनाळे उपस्थित होते.

ग्रामसभेत बोलताना अणवेकर म्हणाले की पांढऱ्या मातीच्या ढिगार्याखाली आढळून आलेले मंदिर यादव काळातील असून पूर्वी तेथे भव्य शिवमंदिर होते. मंदिरावर परकियांचे आक्रमक होऊ नये म्हणून ते मातीच्या ढिगाऱ्याखाली झाकण्यात आले असावे

मंदिराच्या पाठीमागील बाजूस असलेली चिरेबंदी विहीर सुस्थितीत आहे मंदिरातील नक्षीदार खांब देखील सुस्थितीत असून छतावरील नक्षीदार झुंबर सुद्धा व्यवस्थित आहे त्यावर यादवकाळातील शिल्पशैलीचा प्रभाव दिसून येतो त्यामुळे या मंदिराचा जीर्णोद्धार होणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

### काजीकणबस येथे शाक्त पंथाचे केंद्र असावे

**काजी कणबस येथील मारूती मंदिरात वीरगळ द्वारपाल गजलक्ष्मी यांची मूर्ती आहे चामुंडा देवीची अष्टभुजा असलेली मूर्ती देखील आढळून आली आहे देवीच्या हातात विविध आयुधे आहेत ती प्रेतावर उभारलेली आहे तिच्या हातात रक्ताची वाटी आहे छातीवर तिचे लांछन विंचू आहे. देवीच्या गळ्यात नरमुंड माळ आहे. यावरून यादवकाळात काजीकणबस येथे शाक्तपंथ शक्तीची उपासना करणारे प्रमुख केंद्र असावे असे इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी सांगितले.**

### यादव काळातील शिव मंदिराचा जिर्णोद्धार करणार

**पांढऱ्या मातीच्या ढिगार्याखाली आढळून आलेल्या शिव मंदिराचा काजीकणबस ग्रामस्थांच्या वतीने जीर्णोद्धार करण्यात येणार आहे त्यासाठी पुरातत्व खात्याची मदत घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे असे सरपंच अनुसया बंदी छोडे दीपक मंठाळे सुरेश माटगे यांनी सांगितले.**

# जिल्हा परिषद मागासवर्गीय शिक्षक कुटुंब १५ ऑगस्टला करणार उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/प्रतिनिधी :

उल्हासनगर येथील बाळासाहेब मोतीराम अहिरे यांच्या कुटुंबाला गेली वीस वर्षे न्याय मिळत नसल्यामुळे ते येत्या १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद अहमदनगर येथे उपोषणाला बसणार आहेत.

बाळासाहेब अहिरे यांचे वडील मोतीराम अहिरे यांनी कोपरगाव येथील जिल्हा परिषदेत मागासवर्गीय शिक्षक म्हणून सेवा बजावली. मात्र, त्यांचे १९८५ मध्ये निधन झाले. त्यावेळी बाळासाहेब फक्त दोन वर्षांचे होते आणि आई शकुंतला अहिरे अशिक्षित असल्याने पेन्शन किंवा अनुकंपा नियुक्तीसाठी आवश्यक पत्रव्यवहार होऊ शकला नाही.



सज्ञान झाल्यानंतर २००५ पासून बाळासाहेब अहिरे यांनी वारंवार जिल्हा परिषद अहमदनगर आणि कोपरगाव पंचायत समितीला पत्रव्यवहार करून तसेच प्रत्यक्ष भेट देऊन आपली मागणी मांडली. मात्र, अधिकारी सेवा पुस्तक सापडत नाही किंवा नियुक्ती आदेश मिळत नाही अशा कारणांनी विषय टाळत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. न्याय मिळत नसल्याने, तसेच २०२० मध्ये आई शकुंतला अहिरे यांचे निधन झाल्यानंतर, अखेर बाळासाहेब अहिरे यांनी १५ ऑगस्टला उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

# शेतकऱ्याचा धरणात बुडून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा : ईश्वर शालीकराम सोनुने (वय ४५ वर्षे, व्यवसाय - शेती, रा. आवळखेड पोल्ट होतडी, ता. जि. बुलडाणा) यांचा धरणात बुडून मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वर सोनुने हे दिवसभर शेतात काम करून दुपारी सुमारे ५ वाजता धरणावर पोहण्यासाठी गेले होते, असे त्यांनी घरी सांगितले. मात्र संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ते घरी परतले नाहीत.

त्यामुळे त्यांचा मुलगा ओम आणि दुसरा मुलगा दीपक हे वडिलांना पाहण्यासाठी धरणावर गेले. पण तेथे वडील दिसून आले नाहीत. तात्काळ शोधाशोध सुरू करण्यात आली. गावकरी आणि शेजाऱ्यांच्या मदतीने धरण परिसर तपासण्यात आला. शोध घेताना ईश्वर सोनुने हे पाण्यात बुडालेल्या अवस्थेत मृत सापडले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पंचनामा करून मृतदेहाचे पोस्टमॉर्टेम करण्यात आले आणि नंतर अंत्यविधी पार पाडण्यात आला.



# आदिवासी पाड्यात कपडे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो आणि आपल्या हातातून नेहमीचं सामाजिक कार्य घडत रहावं, गरजवंतांना मदतीचा हात मिळावा या भावनेने भिवंडी तालुक्यातील राहुर उडीत आदिवासी पाड्यात महंत श्री शिवरूपानंद स्वामीजी यांच्या तर्फे १०० विद्यार्थ्यांना कपडे वाटप करून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. तर आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी पडघे परिसरातील युवक उपस्थित होते.

# अनंत चैतन्य प्रशालेत रक्षाबंधन उत्सव आनंदमय वातावरणात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर : रक्षाबंधन हा भाऊ - बहिणींमधील अतूट प्रेम आणि आपुलकीचा सण आहे.या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधते,जो तिच्या संरक्षणाचे वचन देतो. हे नातं केवळ रक्ताचं नसून विश्वास,प्रेम व निष्ठेचं प्रतीक आहे.असा हा रक्षाबंधनाचा पवित्र उत्सव आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे अतिशय आनंदी वातावरणात संपन्न झाला.

यावेळी प्रशालेतील पाचवी ते दहावी व कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी व बारावीच्या मुलींनी प्रशालेतील मुलांना राखी बांधल्या विशेष म्हणजे यातील बहुतांश राख्या ह्या मुलींनी स्वतः बनवल्या होत्या. यावेळी मुलांनीही आपल्या बहिणीला ओवाळणी म्हणून शालेय साहित्य भेटस्वरुपात दिले.यामुळे प्रशालेतील मुलां- मुलींमध्ये एकता,सौहार्द व सामाजिक बांधिलकीचे सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पहायला मिळाले.यासोबतच प्रशालेचे प्राचार्य श्री. अशोक साखरे, पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे व समस्त प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर बंधूनाही शिक्षिका भगिनींनी राखी बांधल्यांने या राखी पौर्णिमेच्या पवित्र उत्सवामधून बहीण- भावांमध्ये जपले जाणारे भावनिक नाते अधिकच दृढ झाले. सांस्कृतिक परंपरा समृद्ध करणारा हा रक्षाबंधनाचा स्तुत्य कार्यक्रम प्रशालेत साजरा केल्याने

संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री मल्लिकार्जुन मसुती,सी ई ओ सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी कौतुक केले.



# वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निफाड पोलीस ठाणे, नगरपंचायत, निफाड बस स्थानक येथे अधिकारी कर्मचाऱ्यांना बांधल्या राख्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या स्काऊट गाईडच्या विद्यार्थिनींनी पोलीस ठाणे ,निफाड नगरपंचायत व निफाड बसस्थानक वाहतूक नियंत्रक कार्यालय येथे अधिकारी कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करताना झाडांनाही राख्या बांधून पर्यावरण पर्यावरण पूरक संदेश देण्याचा प्रयत्न केला

वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ यांच्या संकल्पनेतून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

### झाडांनाही राख्या बांधून रक्षाबंधन साजरे




निफाड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक गणेश गुरव व पोलीस कर्मचाऱ्यांना राख्या बांधण्यात आल्या निफाड नगरपंचायत येथे निफाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी धीरज भामरे व अधिकारी, कर्मचारी तसेच निफाड बसस्थानक येथे लासलगाव आगाराचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक नितीन बोठे, निफाड बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रक एस एस गवळी, त्याचप्रमाणे वाहन, चालक यांना राख्या बांधण्यात आल्या याप्रसंगी स्काऊट गाईड प्रमुख के एस चौधरी ,शिक्षक जी एस पवार, श्रीमती आर एस गायकवाड, श्रीमती सी व्ही राऊत, साहिल शेख आदी शिक्षकांसह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

वैनतेय विद्यालयात राखी पौर्णिमा आणि आदिवासी क्रांती दिन साजरा करण्यात आला

वैनतेय विद्यालयामध्ये राखी पौर्णिमेनिमित्त विद्यार्थिनींनी कुंडीतील रोपांना व झाडांनाही राख्या बांधून पर्यावरण पूरक संदेश देण्याचा प्रयत्न केला.

याप्रसंगी व्यासपीठावर वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी गुंजाळ, नगरसेवक साहेबराव बर्डे, टी एस तलवारे श्रीमती एस. एन .पटेल, श्रीमती आर. एम. लाहोटी ,श्रीमती एस. एस. कापसे आदी होते.

विद्यार्थिनींनी या कुंडीतील रोपांचे औक्षण करून राख्या बांधल्या याप्रसंगी राखी पौर्णिमेनिमित्त तयार करण्यात आलेल्या भित्तिपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले याप्रसंगी बी .बी. गुंजाळ, गणेश कुयटे यांचे भाषण झाले.

# ई- पीक पाहणी त्वरीत करून घेण्याचे महसूल प्रशासनाचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शेतकऱ्यांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे ७/१२ उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनामार्फत महसुल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प २०२१ पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार या प्रकल्पात सुधारणा करून रब्बी हंगाम २०२४ पासून पीक पाहणी ही डिजिटल क्रॉप सर्वे प्रणालीद्वारे संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.




सध्या खरीप हंगामातील पीक पाहणी कार्यवाही सुरू आहे. खरीप हंगाम २०२५ साठी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपचे व्हर्जन ४.०.० अद्ययावत स्वरुपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी पचे अपडेट करून घ्यावे. खरीप हंगामातील शेतकरी स्तरावरील पीक पाहणी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ या कालावधीत तर सहाय्यक स्तरावरील पीक पाहणी १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी शक्य तितकी पीक पाहणी स्वतः पुर्ण करावी. पीक पाहणी दरम्यान काही अडचणी आल्यास, संबधित गावकामगार तलाठी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच खरीप २०२५ ची पीक पाहणी सर्व शेतकरी बांधवांनी शासनाने दिलेल्या विहित मुदतीत पुर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# वाळू माफीच्या मुजोरीपणा! माढ्याच्या तहसीलदाराला जीवे मारण्याचा प्रयत्न

## कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वाळू माफियांवर कारवाई करण्यासाठी गेलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यावर हल्ले करण्याचे प्रकार घडत आहे त्यामुळे त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे दिवसेंदिवस वाळू वाफे यांची गुंडगिरी वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे माढ्याचे तहसीलदार संजय भोसले यांना वाळू माफिया कडून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. हा थरार पथकातील अधिकाऱ्याने मोबाईल मध्ये सूट देखील केला आहे. अवैधरित्या वाळू उत्खनन करताना तहसीलदार संजय भोसले यांनी कारवाई केली होती. त्यानंतर ही घटना घडली माढा तालुक्यातील मुंगशी गावात सेना नदीच्या पात्रातून जेसीबी द्वारे वाळू उत्खनन सुरू होते. या ठिकाणी एक टाटा टिपर दोन ट्रॅक्टर ट्रॉलीस वाहनाचे उत्खनन वाहन करून वाहतूक करत असताना तहसीलदार आणि त्यांच्या पथकाने डोका पत्करून पकडले. यावेळी वाहने पकडून येत म्हणून वाळू माफियाने स्कार्पिओ गाडीने तहसीलदाराच्या गाडीला पाठीमागून धक्का देऊन रिव्हर्स गाडी चालवून कारवाईसाठी पुढे जाण्यास अडथळा निर्माण केल्याच्या धकादायक व्हिडिओ पथकातील एकाने शूट केला आहे. यावेळी या वाळू माफियाने तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. याबाबत कुर्डूवाडी पोलीस जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंद झाला असून स्वप्नील कांबळे जेसीबी ट्रॅक्टर, चालकावर गुन्हा नोंद झाला आहे. वाळू माफिया मुळे होणारा त्रास आणि त्याची मजुरी वाढली आहे. अनेक ठिकाणी वाळू उपसा आणि वाहतूक बेकायदेशीरपणे सुरू आहे यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांवर हल्ले होण्याची प्रकारे ही घडत आहेत, त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. माडाचे तहसीलदार संजय भोसले यांनी वाळू माफियांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. अवैद्य वाळू उपसा करण्याविरोधात तहसीलदार भोसले यांनी कारवाई केली होती. यामुळे वाळूमाफियांनी त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. अनेक ठिकाणी वाळूचे अवैध उत्खनन केले जात आहे त्यामुळे नद्या आणि पर्यावरणाची हानी होत आहे.

# श्री क्षेत्र पखालपूर गणपती दर्शनासाठी बसेस सोडण्यात येणार: ग्राहक पंचायतीच्या मागणीला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री क्षेत्र पखालपूर गणपतीच्या दर्शनासाठी बस सोड ण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने पंढरपूर आगार प्रमुख आघाडी केली होती त्यानुसार चतुर्थी दिवशी बसेस सोडण्याची मागणी आगार प्रमुखांनी मान्य केल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.



श्री क्षेत्र पखालपूर येथे प्राचीन, जागृत असे गणपतीचे मंदिर आहे. नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांची श्रद्धा आहे त्या ठिकाणी प्रत्येक महिन्यात चतुर्थी दिवशी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. हे विचारात घेऊन येतील आगार प्रमुख योगेश लिंगायत यांनी प्रत्येक चतुर्थी दिवशी बस फेऱ्या करण्यात येतील असे सांगितले त्यामुळे अनेक वर्षापासून प्रत्येक चतुर्थी दिवशी येथे जाण्या येण्यासाठी बस झालेली एसटीची सेवा पुन्हा सुरू करण्यात येणार आहे मंगळवार दिनांक १२ /८/२०२५ रोजी अंगारकी चतुर्थी या च्या मुहूर्तावर सकाळी आठ पासून रात्री दहापर्यंत पकालपूर येथे येण्या जाण्यासाठी बसेस सेवा सुरू करण्यात येत आहे. या वर्षातील हा एकमेव योग आहे त्यामुळे येथे जाण्या येण्यासाठी भाविकांसाठी मोठी सोय होणार असल्याने सर्वसामान्य भाविक, ज्येष्ठ नागरिक महिला, आनंद व्यक्त केला आहे. तरी प्रवासी भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आव्हान स्थानक प्रमुख अंकुश सरगर, सह वाहतूक निरीक्षक नवनाथ दळवी, ऑडिओ चे माजी सरपंच दिनकर दाजी चव्हाण, गुरसाळीचे सरपंच दीपक शेठ शिंदे, ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, सुहास निघते जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग हल्लापूर, संतोष उपाध्ये, तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंगाला पुरकर संतोष उपाध्ये तालुका सदस्य सागर शिंदे सतीश निपाणकर, यांनी केले आहे.

# रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून फॅबटेकपब्लिक स्कूल जुनिअर कॉलेजमधील मुलींनी रक्षाबंधनाचा कार्यक्रम केला साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला पोलीस स्टेशन मध्ये जाऊन चेक पोस्टवर असणाऱ्या पोलिसांना राख्या बांधून रक्षाबंधन कार्यक्रम साजरा केला असली जी माहिती प्राचार्य सिकंदर पाटील यांनी दिली.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिण भावाकडे जाऊन राखी बांधून आपल्या रक्षणासाठी साखळी घालत असते. मात्र कायदा संस्था आराखत असणाऱ्या पोलीस बांधवांना रक्षाबंधना वेळेस सुद्धा आपल्या बहिणीला त्यांना वेळ देता येत नाही.

यासाठी सांगोला शहराच्या नजीक फॅब्रटेक पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज कॉलेजमधील मुलींनी सांगोला पोलीस स्टेशन मधील पोलीस बांधवांना जाऊन राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

यावेळी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पवन मोरे, विनायक मारू कर, श्रीकांत जाधव, पोपट काशीद, साहेब फौजदार मोहम्मद भुजबळ अनिल बनसोडे, पोलिसांबलदार रुपेश खटकाळे, कैलास खटकाळे राजू आटकळे, बबलू पाटील, गणेश कुलकर्णी, अनेक पोलीस कर्मचारी व फॅक्टर पब्लिक स्कूल मधील चिमुकल्याने राख्या बांधल्या.

हा कार्यक्रम फॅबटेकटेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष निलावरणा बिरा साहेब रुपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रुपनर, सचिव डॉक्टर अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिलीप रुपनर, स्टेट डायरेक्टर डॉक्टर संजय आधाटे, व्यवस्था प्रतिनिधी प्राजक्ता रुपनर, स्कूलच्या सीईओ प्राजक्ता रुपनर, प्राचार्य सिकंदर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली. रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडवलीतर्फे पारस बालभवनात रक्षाबंधन सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित जी. के. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडवलीच्या संस्थाचालक श्रीमती कविता शिकतोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनातून बालभवन शैक्षणिक पुनर्वसन निवासी वसतीगृह टिटवाळा,म्हसकळ येथे रक्षाबंधन सोहळा साजरा करण्यात आला.बहिण भावाचे पवित्र प्रेम रक्षाबंधन या कार्यक्रमातून पहायला मिळाले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. प्रशांत तांदळे सर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. शफीक शेख सर इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. श्री. दिनेश घरत सर, प्रा . महेश कांबळे सर, प्रा. रसिका लोकरे, प्रा. रिया बांगर








या शिक्षकांनी अतिशय शिस्तबद्ध व उत्साहाने कार्यक्रम पार पाडला.

कार्यक्रमात सर्वप्रथम माई सौ. संगीता गुंजाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालया मार्फत सत्कार स्वागत करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री .घरात सर यांनी केली. माणुसकी बघितली तर दिसते ,मानली तर मिळते व ओळखली तर शेवटपर्यंत राहते असे प्रतिपादन सौ. संगीता गुंजाळ(माई) यांनी पारस बाल भवनाची माहिती देताना आपल्या भाषणात व्यक्त केले.

कार्यक्रमास कु.अनुष्का, साक्षी, कृतिका, रूपाली, अलबीना, जस्सीका, श्वेता, ऋतिका, ज्योती, दिव्या, मयुरी, सारिका, प्रणिता, निकिता, सुष्मिता इत्यादी विद्यार्थिनींनी महाविद्यालयात स्वता राख्या बनविल्या व बालभवन मधील मुलांना त्या राख्या बांधल्या. याप्रसंगी बालभवन मधील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावरचा निरागस भाव व आनंद झळकलेला पाहून सर्वांचं मन भरून आलं. मुलं इतकी खुश होती की त्यांनी एक सुरात अनेक गीते सादर केली.या कार्यक्रमाचा समारोप सौ. रसिका लोकरे यांच्या मनोगताने करण्यात आला.

# विविध क्षेत्रात कृष्णाजी यांचे उल्लेखनीय कामकाज कधीही विसरता येणार नाही : क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नरप्रतिनिधी/सोमनाथगिरी : राजकीय, सामाजिक ,शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध संस्थेवर आपल्या कर्तुत्वाच्या व सर्वांना सोबत घेऊन मोठे काम करणारी व्यक्ती तसेच विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवून समाजकार्यांमध्ये सतत अग्रेसर राहिले आहे. अत्यंत प्रतिकुलातून ज्यांचे नेतृत्व आपल्यासमोर उभे राहिले असे कृष्णाजी भगत यांचे कार्य अतिशय अतुलनीय आहे असे प्रतिपादन क्रीडामंत्री ड माणिकराव कोकाटे यांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक व सिन्नर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमात केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते प्रकाश वाजे होते . प्रमुख अतिथी म्हणून खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सत्यजित तांबे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे, माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माजी अध्यक्ष अरविंद कारे, माजी आमदार सुधीर तांबे, संचालिका शालिनीताई सोनवणे , माध्यमिक लोक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब गडाख हे होते.

कृष्णाजी भगत व शकुंतला भगत यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन पुष्पहार घालून करण्यात आला. यावेळी कृष्णाजी भगत यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार यांनी आपल्या मनोगतात भगत कुटुंबातील व पवार कुटुंबातील ऋणानुबंध याबद्दल आपले विचार मांडले व कृष्णाजी तसेच दिवंगत माजी सरचिटणीस वसंतरावजी पवार यांचे अतिशय सलोख्याचे संबंध होते . डॉक्टरांच्या विचारधारेशी अतिशय एकरूप असलेले सिन्नर तालुक्यातील व्यक्तिमत्व कृष्णाजी भगत असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

शिक्षक आमदार सत्यजित तांबे यांनी कृष्णाजी भगत यांच्या कार्यावर प्रकाश झोत टाकत त्यांनी केलेल्या कार्याचा धावता आढावा घेतला.

संस्थेचे सरचिटणीस ॲड नितीन ठाकरे यांनी संस्थेच्या जडणघडणीत कृष्णाजी भगत यांचे योगदान व भगत परिवार हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा असल्याचे आपल्या मनोगतात सांगितले. ज्येष्ठ नेते प्रकाश भाऊ वाजे यांनी कृष्णाजी यांच्या जीवनातील प्रसंग सांगत भगत व वाजे कुटुंब हे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध असल्याचे आपल्या मनोगतातून विचार मांडले.

ज्येष्ठ नेते प्रकाश वाजे यांच्या हस्ते कृष्णाजी भगत यांच्या भगिनींना साडी चोळी देऊन त्यांचा सन्मान सत्कार करण्यात आला.

भगत कुटुंबातील कृष्णाजी भगत यांची सून वर्षा, मेघा नातू पुष्कर व पुतणे मयूर यांनी आपले विचार मांडले. तसेच मेघा भगत यांनी आपल्या कवितातून सासरे कृष्णाजी भगत यांच्या विषयी अतिशय सुंदर कविता सांगितली. तर वर्षा भगत यांनी कुटुंब प्रमुख कसे असतात याचे अतिशय सुंदर असे उदाहरण सर्वांसमोर मांडले.

**कृष्णाजी भगत यांचे कुटुंब एक आदर्श कुटुंब..**

कृष्णाजी भगत यांचे कुटुंब एक आदर्श कुटुंब असल्याचे अनेकांनी आपल्या भाषणात सांगितले. या कुटुंबातील त्यांचा मोठा मुलगा मनोज, पुतणे मयूर, अक्षय, रोहित, हरी तसेच नातू आदित्य, पुष्कर, तसेच सून वर्षा शितल, मेघा, शिवानी आदीं.

सूत्रसंचालन राजेंद्र देशपांडे यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर, मविप्र संस्था सभासद, शालेय समितीचे अध्यक्ष, आजी-माजी मुख्याध्यापक ,शिक्षक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

**'एमएसबीटीई' तर्फे आठवडाभर चालणार हा उपक्रम**

# स्वेरी पॉलिटेक्निकमध्ये 'एआय व डेटा सायन्स' वरील प्रशिक्षणाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) मधील इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी व कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या विभागांच्या वतीने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे आयोजिलेल्या 'इमर्जिंग ट्रेंड्स इन एआय अँड डाटा सायन्स: हँड्स ऑन एक्सप्रेन्स वूईथ इंडस्ट्री ५.०' या विषयावर एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम (एफडीटीपी) आजपासून सुरू झाला असून त्याचे आज उदघाटन करण्यात आले.




एमएसबीटीई अर्थात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे आयोजिलेला हा उपक्रम सोमवार, दि.११ ऑगस्ट पासून ते शनिवार, दि.१६ ऑगस्ट २०२५ पर्यंत चालणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधील २७ प्राध्यापकांनी सहभाग घेतला आहे. यासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रोअझ्युर सॉफ्टवेअर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे प्रकल्प व्यवस्थापक (प्रोजेक्ट मॅनेजर) बापूजी अरकस हे लाभले होते. दीपप्रज्वलनानंतर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे विभागप्रमुख प्रा.अमेय भातलवंडे व कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत भंडारे यांनी स्वागत करून आठवडाभर चालणाऱ्या या प्रशिक्षणाचे स्वरूप स्पष्ट करून 'या प्रशिक्षणातून नवनवीन गोष्टी शिकून त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी करावा' असे आवाहन केले. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना नवनवीन गोष्टी शिकवण्यासाठी कोणत्या पद्धतींचा अवलंब करता येईल याबाबत माहिती दिली. तर स्वेरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ यांनी 'डेटा सायन्स' म्हणजे मोठ्या प्रमाणातील डेटामधून उपयुक्त माहिती, नमुने आणि निर्णय घेण्यासाठी लागणारा आधार मिळवण्याचे विज्ञान आहे. यामुळे कार्यक्षमता वाढते, चुका कमी होतात आणि निर्णय क्षमतेचा वेग वाढतो.' असे सांगून या प्रशिक्षण कार्यक्रमातून मिळणारे ज्ञान विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कसे उपयुक्त ठरेल, याबाबतही त्यांनी विचार मांडले. प्रमुख अतिथी बापूजी अरकस यांनी 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' हे सध्या सर्वच क्षेत्रात वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान असून कमी वेळेत अधिक काम पूर्ण करण्याची क्षमता, मानवी त्रुटी टाळून अचूक निकाल देण्याची क्षमता, श्रम व खर्चात बचत, तसेच आरोग्य, विज्ञान, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात संशोधनाला गती मिळवून देणारे हे तंत्रज्ञान आहे.' असे सांगून 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' याबाबत सविस्तर माहिती दिली. एकूणच या 'ए आय' आणि 'डाटा सायन्स' विषयावरील एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट ट्रेनिंग प्रोग्राम (एफडीटीपी) ला प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. पांडुरंग वलटे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. श्रीधर कुलकर्णी हे उपस्थित होते. प्रा. ऐश्वर्या सावंत यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रशिक्षणाच्या समन्वयिका प्रा. रेश्मा मलगोंडे यांनी मानले.

# महाराष्ट्र स्वराज्य पक्षाची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई/केतन भोज : महाराष्ट्र स्वराज्य पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्षाचे नेते सरचिटणीस धनंजय भाऊ जाधव स्वराज्य पक्षाचे नेते उपाध्यक्ष अंकुश कदम बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी अँड ओमकार विठ्ठल जाधव- रायगड जिल्हा युवक अध्यक्ष, अजित घाडगे - रायगड जिल्हा उपाध्यक्ष, अमित शिर्के - रायगड जिल्हा युवक सचिव, दिनेश काळंगे - रायगड जिल्हा युवक सहसचिव, मनोहर पाटील - रायगड जिल्हा युवक संघटक, सचिन माने - रायगड जिल्हा युवक उपसंघटक,ऋषिकेश घुले - रायगड जिल्हा युवक उपसंघटक इत्यादी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

यावेळी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देत आपण हेवा वाटावा असे कार्य करून गाव तिथं शाखा घर तिथं स्वराज्य या संकल्पनेतून छत्रपती संभाजीराजे महाराज यांचे विचार व पक्षाचे कार्य घराघरात पोहचण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न कराल असा विश्वास आहे असे मत महाराष्ट्र स्वराज्य पक्ष मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी व्यक्त केले.

दैनिक **यश सिद्धि न्यूज**



## थोडक्यात...

### शांती चौकातून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : शांती चौक येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीएक्स.९०५० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या दरम्यान घडली या प्रकरणी कालिदास रुतप्पा मन्नापुरे (वय-५२,रा.तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बाबर हे करीत आहेत.

### घराजवळूत चोरट्याने पळवली दुचाकी

सोलापूर, (प्रतिनिधी) : हँडल लॉक करून ठेवलेली ९० हजार रुपये किमतीची टॉर्क कंपनीची दुचाकी क्रमांक एमएच.१३. ईएल.१६६६ ही महागडी दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे घटना १० ऑगस्ट रोजी घडली.याप्रकरणी स्वप्निल सुखदेव सन्नके (वय-३६,रा. उत्कर्ष नगर,जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### ट्रॅव्हल्स मध्ये पॅसेंजर भरण्याच्या कारणावरून सळईने मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : ट्रॅव्हल्स मध्ये पॅसेंजर भरण्याच्या कारणावरून शिवीगाळ करत लोखंडी सळीने मारहाण केल्याची घटना ८ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास डी मार्ट समोर घडली.याप्रकरणी तुकाराम मारुती कांबळे (वय-२१,रा.जय मल्हार चौक,बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सचिन शिवाजी गायकवाड (रा. न्यू बुधवार पेठ) याच्यासह इतर तीन अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,डी मार्ट समोरील ट्रॅव्हल्स मध्ये पॅसेंजर भरण्याच्या कारणावरून फिर्यादी यांना तुकाराम कांबळे याने शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.तसेच लोखंडी सळईने फिर्यादी यांच्या डोक्यात व तोंडावर मारून एक दात पाडून जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास सहाय्यक फौजदार ओव्हळ हे करित आहे.

# वाळू माफियांवर पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई; पाच लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त

## दोन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील आंबे या गावात पोलिसांच्या पथकाने वाळूचे भरलेले आयशर कंपनीचा ट्रक पकडला. वयात अंदाजे दोन ब्रास वाळू असा एकूण पाच लाख १२ हजार रुपये चा मुद्देमाल जप्त केला . या प्रकरणातील दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आले. पंढरपूर तालुक्यातील पोलिसांनी केलेल्या कारवाईची सर्वत्र कौतुक होत आहे.

सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने वाळू माफेवर मोठी कारवाई केली. वाळूमातुक करणाऱ्या आयशर कंपनीचा ट्रक या दोन ब्रास वाळू जप्त केली व या वाहनाचा चालक भय्या उत्तम शिंदे आणि मालक दोघांवरही गुन्हे दाखल करण्यात आले हे दोघेही आंबे येथील रहिवासी आहेत.

रहिवाशी असून त्यांच्या विरोधात डीएनएस कायदा कलम ३०३, ३०५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. सदर पुण्यातील भैया उत्तम शिंदे या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे वही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत इंगळे पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पीए-सआय भारत भोसले पोलीस हेडकॉन्स्टेबल सुजित उबाळे सुहास देशमुख मंगेश रोकडे यांच्यासह पथकाने कारवाई केली आहे.

## २७ वर्षानंतरही गुरुजनांना आवर्जून बोलावणं हे आमच्यासाठी सुखद : काळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आचेगांव : दहावी नंतर २७ वर्षांनीसुद्धा माजी शिक्षकांना गुरुजनांना स्नेह-मेळाव्याच्या निमित्ताने बोलावून त्यांच्या प्रती आदर व्यक्त करणे हे आम्हा शिक्षकांचे परमभाग्य असल्याची भावना श्री शावरसिद्ध हायस्कूल आचेगांवचे माजी मुख्याध्यापक एस. एम. काळे सर यांनी व्यक्त केले.

वळसंग ता. दक्षिण सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ हॉल मध्ये आयोजित आचेगांव श्री शावरसिद्ध हायस्कूलच्या ५ वी ते १० वी दहावी बॅच १९९७-९८ च्या 'माजी शिक्षक, विध्यार्थी स्नेह मेळावा' प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

पुढे बोलताना एस. एम काळे सर म्हणाले कि आधी प्रपंचाकडे लक्ष देऊन व्यसनापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे त्याच प्रमाणे आपण समाजाचे काही देणं लागतो म्हणून समाजकार्य देखील करण्याचा होता होईल तितका पर्यत्न ही केला पाहिजे.असे सांगितले यावेळी माजी पर्यवेक्षक लिंबण्णा दुलंगे, शिवशरण म्हेत्रे, इराप्पा कांबळे, कलप्पा तळवार, शिवाजी साबळे, दाजी माने, रेवणसिद्ध पाटील, विध्यमान मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार, पर्यवेक्षक बसवराज पाटील, अमीन पाटील, बाबुराव जाधव, शावरसिद्ध म्हेत्रे आदी आजी माजी शिक्षक उपस्थित होते. यावेळी लिंबण्णा दुलंगे,शिवशरण म्हेत्रे, शिवाजी साबळे,इराप्पा कांबळे, रेवणसिद्ध पाटील,कलप्पा तळवार आदी शिक्षकांनी व डॉ रवींद्र बनसोडे, सैपन शेख, सुभाष भीमाण्णवरु लवान गोतसुर्वे, अनिल बर्वे,लक्ष्मण म्हेत्रे, मडीवाल कलशेट्टी, श्रीशैल तीर्थकर, शोभा सोनकडे, जगदेवी मायनाळे, राजभाई कारंजे आदी माजी विध्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सर्व प्रथम कार्यक्रम अध्यक्ष व मान्यवर माजी शिक्षकांच्या हस्ते प्रतिमा पूजन व द्विपप्रज्वलन करण्यात आले, प्रास्ताविक सुभाष भिमण्णवरु यांनी केल्यानंतर माजी शिक्षकांचे स्मृतीचिन्ह, शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आले.यावेळी सर्व शिक्षक व माजी विध्यार्थ्यांना फेटे बांधण्यात आले.

या स्नेह मेळाव्यातील 'एक दिवसीय शाळेत' सर्व माजी विध्यार्थ्यांनी आपले परिचय आपल्या शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन केला व त्यातील काहींनी आपले कलागुण सादर केले,

तब्बल २७ वर्षांनी आपल्या माजी शिक्षकांना व मित्रांना भेटण्याचा योग आल्याने सर्वांचा आनंद गगनात मावत नव्हता. माजी शिक्षक साबळे यांचे गीत आणि इतर शिक्षक विध्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणीना उजाळा दिला. विध्यार्थीदशेत एक तास लवकर संपत नव्हता पण २७ वर्षांनी भरलेली 'एक दिवसीय शाळा' सकाळ पासून सायंकाळ पर्यंत भरून सुद्धा फार लवकर संपल्याची भावना सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. सूत्रसंचालन बलवान गोतसुर्वे यांनी केले तर आभार अनिल बर्वे यांनी मानले.

## पंढरपूर - विठ्ठल मंदिरात हिंदीत भाषेत पुजा केल्याच्या तक्रारींबाबत संबंधितांना दिल्या आवश्यक त्या सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या वतीने भाविकांना श्रींच्या विविध प्रकारच्या पुजा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये श्रींच्या तुळशीपुजेचा समावेश आहे. सदर पुजा बुकींगसाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, ही पुजा देशभरातील भाविक घरबसल्या बुकींग करून पुजेसाठी येत असतात. या भाविकांना पुजेची माहिती व्हावी व पुजेच्या अनुषंगाने सुचना देण्यासाठी प्राधान्याने मराठी व आवश्यक भासल्यास हिंदी भाषेतूनही माहिती / सुचना देण्यात येतात. मात्र, पुजेचे मंत्र हे मराठी व संस्कृत भाषेतून पठण करण्यात येते. यामध्ये पूजा करण्यासाठी इतर कोणत्याही भाषेचा वापर करण्यात येत नाही.

सदरच्या तुळशी पुजेवेळी श्री संत तुकाराम भवन येथे आचमन करून व संकल्प करण्यात येतो. त्यानंतर श्री गणपतीचे स्मरण, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे स्मरण व विष्णूसस्त्रनाम पठण करून पुजा करण्यात येते. यासाठी मराठी व संस्कृत भाषेचा वापर करण्यात येतो. तथापि, पुजे संबंधी माहिती सर्व भाविकांना व्हावी या उद्देशाने प्राधान्याने मराठी व आवश्यकता भासल्यास हिंदी व इतर भाषेतून माहिती देण्यात येते.

श्री राहूल सातपुते या भाविकांने केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेण्यात आली असून, संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## आंबाशी गावातील पाण्याच्या समस्येवर गजानन वायाळ सह ग्रामस्थांचा आवाज, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा : चिखली तालुक्यातील आंबाशी गावात ९ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावात पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पाऊस आणखी काही वेळ चालू राहिला असता तर जीवितहानीचीही शक्यता होती.

यापूर्वी २०२१मध्येही अशीच घटना घडली होती, मात्र त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. जिल्हा परिषद सिंचन विभागाच्या तलावातील सांडपाणी तसेच रस्ता व डोंगरावरून वाहणारे पाणी थेट गावात शिरते.

गावातील नागरिकांनी, गजानन वायाळ सह, पाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याची आणि भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे. अन्यथा पुन्हा झालेल्या अनिष्ट प्रकारासाठी प्रशासन जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

ग्रामस्थांचे निवेदन चिखली तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आले आहे. निवेदनावर गावकऱ्यांच्या सह्या आहेत.

## बाल संगोपन योजनेच्या गुणवान विद्यार्थ्यांचा पंढरपूर येथे सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय तपकिरी शेटफळ तालुका पंढरपूर संचालित महिला व बाल विकास विभाग मान्य प्राप्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपनयोजनेचा दहावी व बारावी या बोर्डाच्या परीक्षेत गुणवत्तापूर्ण यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा पंढरपूर येथील प्राथमिक शिक्षक सोसायटीच्या सभागृहात मान्यवर पाहुण्यांच्या शुभहस्ते ट्रॉफी मेडल देऊन सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आली.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे माजी सभापती राजेंद्र पाटील, पांडुरंग सहकारी साखर आणि संचालक तानाजी वाघमोडे, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार चंद्रभागा सहकारी सहकार्याने माजी संचालक सुधाकर कवडी पंढरपूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे एसपी महिला अध्यक्ष राजश्री ताड शिळवे गावचे पालक



**बाल संगोपन योजनेत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याचा प्रयत्न करणार: शत्रुघन कांबळे**

प्रतिनिधी संजय गाजरे सर ही उपस्थित होते यावेळी तानाजी वाघमोडे सुधाकर कवडे यांनी बाल संगोपन योजनेची हिंदी सिओ चे प्रमुख शत्रुघन कांबळे यांच्या मागील २५ ते ३० वर्षाच्या समाजसेवेचा गौरव ही पूर्व उल्लेख करून बालसंगोपन योजनेच्या पालकांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची अश्वस्थ केले.

यावेळी राजेंद्र पाटील यांनीही आपले विचार मांडले राजश्रीताड यांनी संस्थेच्या कामाची भरभरून कौतुक केले व पंढरपूर तालुक्यातील योजनेच्या लाभार्थींची संख्या वाढवावी अशी मागणी केली संस्थेचे प्रमुख श्री शत्रुघन कांबळे सरांनी प्रास्ताविक भाषणांमध्ये संस्थेकडील दोनशे लाभार्थ्यांचा आढावा घेऊन २०० बालकांपैकी १८८ पालकांना अनुदान असल्याचे सांगितले बारा लाभार्थ्यांना आधार शेडिंग मॅपिंग अभावी अनुदान असल्याचे सांगून त्यांनी त्यांच्या बँकेची संपर्क साधून शेडिंग करून घ्यावी व दोनशे लाभार्थी पैकी अनुदान वाचून कोणीही वंचित राहणार नाही असे आश्वास केले व तसेच भविष्यात चारशे लाभार्थ्यांचे उद्दिष्ट पूर्ण करू असे आश्वासन केले.

यावेळी पालकांचेही सन्मान करण्यात आला शासनाच्या मानसे हे मध्ये अंगणवाडी सेविका पदावर निवड झालेल्या श्रीमती सोनाली घुले चिचुंबे श्रीमती शोभा मती आणवली तर श्रीमती रेश्मा शेख सगळे स्त्री परिचारिका यांचा सन्मान करण्यात आला व पालकांच्या वतीने श्रीमती सोनाली घुले यांनी आपले विचार मांडून संस्थेच्या कामाची योजनेची कौतुक करून समाधान व्यक्त केले यावेळी २०० पालक व बालक उपस्थित होते सूत्रसंचालन अतुल सकाळी सर यांनी केले तर आभार संजय गाजरे यांनी मानले.

**गरोदर महिलांची होतेय गैरसोय; आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार**

**आरोग्य विभागाने लक्ष देण्याची गरज**

# मुरबाड तालुक्यात लाडक्या बहिणींची प्रसूती 'राम भरोसे'



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई पासून हाकेच्या अंतरावरील असलेल्या मुरबाड तालुक्यात आरोग्य सेवेच्या बाबतीत पाहिलं गेल तर मुरबाड व टोकावडे येथे दोन ग्रामिण रुग्णालय ९ प्राथमिक आरोग्य केद्रं व ३० उपआरोग्य केंद्रावरून येथील गोरगरीब सर्वसामान्य वाडी, वस्ती वरील अदिवासी पाड्यातील रूग्णांना मोफत उपचार मिळावा म्हणून शासनाकडून प्रयत्न केले जातात, आरोग्य सेवेच्या नावाखाली येथे कोट्यावधी रूपयांच्या इमारती बांधण्यात आल्या परंतु त्या ईमारतीत रुग्णांना उपचार करणारे तज्ञ डाँक्टरच नसतील तर रुग्णांनी करायचे काय ? असा प्रश्न समोर आला असून मुरबाडमध्ये आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजले आहेत. असे चित्र समोर येत आहे. मुरबाड तालुक्यातील आदिवासी दुर्गमभागात टोकावडे येथे रुग्णालयात स्रीरोगतजन्य डाँक्टर नसल्याने येथे वेळोवेळी ज्या गरोदर माता भगिनींची प्रसुतीची वेळ भरली असेल तर त्यांना रस्त्या अभावी डोली करून आणावे लागते दवाखाना गाठला तर तेथे स्रीरोग तज्ञ डाँक्टर नसल्याने त्या महिलेस पुढील उपचारासाठी म्हणजे प्रस्तुती करण्यासाठी २४ किमी अंतरावरील मुरबाड रूगणालयात न्यावे लागते. मुरबाड येथील रूगणालयात देखील कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ञ डाँक्टर कायम स्वरूपी नसून तो त्याचे सोमवार, बुधवार, शनिवार असे तीन वार ठरलेले आहेत. टोकावडे रुग्णालयातून मुरबाडला पाठविलेली प्रसूतीची केस मुरबाडला कायमस्वरूपी डॉक्टर नसल्याने नाईलाजास्तव त्या महिला, माता-भगिनींच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याने खाजगी दवाखान्यात धाव घ्यावी लागते, महागडे उपचार घ्यावे लागतात. मुरबाड सारख्या आदिवासीबहुल भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा देखील योग्य मिळत नसतील, त्यात प्रसूतीच्या वेळी अत्यावश्यक रुग्णवाहिका सेवा देखील कंत्राटी व स्त्रीरोगतज्ञ देखील कंत्राटी पद्धतीने काम करीत असतील तर येथील आरोग्यसेवेच्या या भोंगळ कारभाराचा फटका प्रसूती सारख्या गंभीर प्रसंगी बसून येतोच सोबत गरोदर महिला सुखरूप हवी असेल तर खाजगी दवाखान्याचा भुर्दंड भोगावा लागतो तो वेगळाच. त्यामुळे आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलेला दिसून येत आहे. तर याकडे आरोग्य विभाग लक्ष देईल का? याकडे रुग्णांचे,नागरिकांचे लक्ष वेधले आहे.